# विशेष : सहकारातून वनीकरण - एक नवा मंत्र



"टिटवाळ्याजवळ ५० एकर जमिनीवर आम्ही वनीकरणाचा एक अभिनव प्रयोग राबवतोय. तुम्ही आमच्या प्रकल्पाला भेट द्याल का ?" निवृत्त वन अधिकारी अनिल ठाकरे यांनी आमच्या पहिल्या संवादातच मनापासून आमंत्रण दिलं. मी या प्रकल्पाबद्दल ऐकून होतोच. त्यामुळे मी लगेच होकार दिला. पुढच्याच आठवड्यात श्री. ठाकरे, मी, माझी पत्नी आणि ञ्इकॉलॉजिकटच्या संचालिका सुरेखा सोनवणे आणि दि कल्याण जनता सहकारी बँकेचे माजी संचालक वामनराव साठे, बँकेचे कर्मचारी श्याम चव्हाण असे सारे जण कल्याणहून रवाना झालो. तासाभराच्या प्रवासात या प्रकल्पाची संकल्पना समजावून घेतली आणि प्रत्यक्ष तिथे पोहोचल्यावर तर थक्कच झालो !...



प्रकल्पाला भेट देताना 'इकॉलॉजिक'च्या संचालिका सुरेखा सोनवणे व 'रानवाटा'चे संपादक अनंत सोनवणे. प्रकल्पाची माहिती देताना वामनराव साठे व अनिल ठाकरे

दि कल्याण जनता सहकारी बँक आणि दि ठाणे भारत सहकारी बँक या ठाणे जिल्ह्यातल्या दोन शेड्युल्ड सहकारी बँका. पैसा जमवणं, पैसा वितरित करणं हे यांचं काम. ते तर सगळ्याच बँका करतात. पण या दोन बँकांनी पुढाकार घेऊन एक जंगल निर्माण करण्याचा जो वसा घेतलाय, तो या बँकांना इतरांपेक्षा वेगळं सिद्ध करतो. गेल्या सहा वर्षांत अथक परिश्रम घेऊन या बँकांनी काळू नदीच्या काठावरचा हा परिसर हिरवा केलाय. ठाणे वन विभागाच्या अखत्यारितली मौजे म्हसकळ इथला हा ५० एकरचा पट्टा सहा वर्षांपूर्वी निव्वळ उजाड माळरान होता. आज तिथं वेगवेगळ्या १२० प्रजातींची २१ हजार झाडं डोलत उभी आहेत. त्यांच्या आधारानं तिथं वन्यजीवनही बहरू लागलंय. पण इथवरचा प्रवास सोपा नक्कीच नव्हता.



प्रकल्पाला भेट देण्यासाठी दूरदूरहून पाहुणे येतात आणि वामनराव साठे उत्साहाने त्यांना हिरवाईची सैर करवतात.

राज्य सरकारच्या वन संवर्धन धोरणानुसार खाजगी संस्थांच्या सहभागातून वन क्षेत्रावर वन विकासाचे प्रकल्प राबवले जातात. त्यासाठी संबंधित वित्तीय संस्था, एनजीओ आणि वन विभाग यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार केला जातो. सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशानं कल्याण जनता आणि ठाणे भारत सहकारी बँकेच्या संचालकांनी सरकारच्या या योजनेला सकारात्मक प्रतिसाद द्यायचं ठरवलं. वनीकरणासाठी म्हसकळ इथलं २० हेक्टर क्षेत्र निवडण्यात आलं. प्रकल्पासाठी दोन्ही बँकांनी प्रतिवर्षी होणा-या नफ्यातून १ % निधी राखीव ठेवण्यात आला. प्रकल्पाच्या कामाच्या व्यवस्थापनासाठी कल्याणच्या संचालक समाजसेवा पुरस्कार निधी या एनजीओची नियुक्ती झाली. आणि १७ मे २००७ रोजी त्रिपक्षीय सामंजस्य करार ठाण्यात समारंभपूर्वक करण्यात आला. कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यावर आणि जमीन ताब्यात आल्यावर प्रकल्प सल्लागार अनिल ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. संपूर्ण क्षेत्राचं सर्वेक्षण करून क्षेत्राची १०० x ५० मीटर अशा ग्रीडमध्ये विभागणी करण्यात आली. ग्रीडनिहाय लागवडीचा आराखडा तयार करून दरवर्षाची टार्गेट्स ठरवली गेली. १ जुलै २००७ रोजी प्रत्यक्ष वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमानं वनीकरणाचा महायज्ञ सुरू झाला; तो आजतागायत सुरू आहे.

वनीकरणासाठी झाडांच्या स्थानिक प्रजातींना प्राधान्य द्यायचं आणि अस्तित्वात असलेल्या नैसर्गिक झाडांना धक्का लावायचा नाही, हे सुरूवातीलाच ठरलं होतं. त्यानुसार कदंब, सावर, शिसम, आवळा, शमी, शिसू, रूद्राक्ष, रबर, महोगनी, वड, पिंपळ, बेल, कवठ, नीम, खैर, अमलताश, बांबू इत्यादी २१ हजार रोपांची लागवड टप्प्याटप्प्यानं करण्यात आली. आधीच्या सुमारे ७ हजार प्रजातींचंही संवर्धन करण्यात आलं. लागवडीचे कार्यक्रम समारंभपूर्वक करून त्यात ग्रामस्थ, विद्यार्थी, महिला मंडळं, व्यापारी मंडळं अशा विविध समान घटकांना आवर्जून सहभागी करून घेण्यात आलं. लागवडीत विविधता असावी यासाठी सुमारे १२० प्रजातींची लागवड करण्यात आलीय. झाडांचं धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवावं, यासाठी नक्षत्र वन उद्यान, अष्टदिशा वृक्ष उद्यान, नवग्रह उद्यान, गणेश पत्री उद्यान अशी अभिनव उद्यानं तयार करण्यात आली. काही औषधी वनस्पती आणि मसाल्याच्या प्रजातींचीसुद्धा लागवड़ करण्यात आली. जल आणि मृदसंधारणासाठी तीन तलाव तयार करण्यात आले. त्यांची पाणी साठवण्याची क्षमता प्रत्येकी ३०० घनमीटर आहे. दोन बँकांचे हे प्रामाणिक प्रयत्न पाहून महेन्द्र लाईफ स्पेसेस लिमिटेड, जॉन्सन एन्ड जॉन्सन, येन्सन एन्ड सिरॅग या कंपन्यांनी प्रकल्पाला आर्थिक पाठबळ दिलं.




२००८ मध्ये प्रकल्पाच्या ठिकाणी असं दृश्य होतं. वनीकरणाने या जमिनीचा कायापालट केला.

अर्थात केवळ रोपं लावली म्हणजे जंगल निर्माण होत नाही. ही रोपं जगावित, वाढावित यासाठी खूप काळजी घ्यावी लागते. खत, औषधं, कीटकनाशकं याबरोबरच उन्हाळ्यात पाण्याचीही व्यवस्था करावी लागते. अतिक्रमणापासून क्षेत्राचं संरक्षण करावं लागतं. दोन्ही बँकांचे संचालक, विशेषत: ठाणे भारत सहकारी बँकेचे उपाध्यक्ष उत्तमराव जोशी आणि कल्याण जनता सहकारी बँकेचे माजी संचालक वामनराव साठे यांनी गेली ६ वर्षे हे सारं अगदी मनापासून केलं. त्याचाच परिणाम म्हणून आज तब्बल ९०% रोपं जिवंत आहेत! झाडांची वाढही उत्तम होतेय. परिसरात भारद्वाज, सातभाई, शिला इत्यादी ३० प्रकारच्या पक्ष्यांची लिबिल ऐकू येऊ लागलीय!



इकॉलॉजिक'च्या संचालिका सुरेखा सोनवणे प्रकल्पाच्या ठिकाणी वृक्षारोपण करताना.

सहकार चळवळीची मोठी परंपरा असलेल्या महाराष्ट्राला सहकारातून वनीकरणाचा एक नवा मंत्र ठाणे जिल्ह्यातल्या दोन सहकारी बँकांनी दिलाय. इतर बँका आणि कंपन्यांनी त्यांचा आदर्श समोर ठेवून जंगल संवर्धनाच्या कामाला हातभार लावायला हवा आणि वन विभागानंही खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यासाठी आवश्यक धोरणांचा खुलेपणा दाखवायला हवा.



**लेखक : अनंत सोनवणे**
**संपादक, www.ranvata.in**